महाराष्ट्र शासन

# शिक्षणाधिकारी (माध्य)

शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद,जळगांव

Email.seceduzpjalgaon@gmail.com

दिनांक :- २/०३/२०२२

जा.नं.शिक्षण/माध्य/नाव दुरुस्ती/ ९६ /२०२२

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक विदयालये,
जि. जळगांव.

विषय :- नाव, आडनांव, वडिलांचे नांव/आईच्या नावात बदल दुरूस्ती करणेबाबत.

संदर्भ - शा.नि.प्र.ई.मव्ह. १५१७/प्र.क्र.१९ संगणक दि. १४/०८/२०१७.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक विदयालयात शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांचे नांव / आडनांव / वडिलांचे नांव / आईचे नावामध्ये बदल दुरूस्ती करण्याचे अनेक प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त होत आहे. त्यामुळे कार्यालयीन वेळ खर्ची होत आहे.

संदर्भीय शासन निर्णयातील मुददा क्र. ३.३ अन्वये स्टुडंट पोर्टलमध्ये विदयार्थ्यांच्या नमूद केलेला आधार क्रमांक व नांव याबाबतची माहिती शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे देण्यात येत आहे. माहिती व तंत्रज्ञान विभाग आधार क्रमांकानुसार विदयार्थ्यांचे नांव काय दिसते ते स्पष्ट करेल जर नावात साम्य असेल तर ती नावे अंतिम केली जातील त्याचप्रमाणे विदयार्थ्यांचे नाव व इतर माहितीबाबत शाळेला कळविले जाईल. त्या आधारे जनरल रजिष्टर ला दुरुस्ती करावी. शाळेच्या जनरल रजिष्टरमध्ये आधारकार्डप्रमाणे संबधित विदयार्थ्यांचे नांव असावे.

उक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये विदयार्थ्यांच्या नाव / आडनाव / वडिलांचे नांव / आईच्या नावामध्ये दुरुस्ती अथवा बदल करून जनरल रजिष्टरमध्ये नोंद घेण्याचे अधिकार आपणांस देण्यात आलेले आहेत. तरी आपल्या माध्यमिक व विदयालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांचे नांव / आडनांव / वडिलांचे / आईच्या नावामध्ये आवश्यक ते बदल करून त्यानुसार जनरल रजिष्टरमध्ये नमूद करण्यात यावे. तसेच यापुढे नाव/ आडनांव / वडिलांचे नांव / आईचे नांव याबाबतचे प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्यात येवू नये. सादर केल्यास सदरचे प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२/३/२२

(डॉ. नितीन बच्छाव)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक )
जिल्हा परिषद जळगांव

E:\s1\Letter pad



Scanned with CamScanner